# परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती

विद्यार्थी परिचारिका वसतिगृह इमारत, तळ मजला,सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - 400 001.

वेबसाईट: msbnpe.org ई-मेल- ppasss2022@gmail.com ,मो. नं: 022 22611015

# NURSING DIPLOMA COURSE SHIKSHAN SHULKA SAMITI

Student nurses hostel building, Ground floor, St. Georges hospital campus, p.d'melo road, Fort,Mumbai400001

website: msbnpe.org e-mail- ppasss2022@gmail.com, mobile no- 022 22611015


क्र.पपाअशिशुस /शिक्षण शुल्क समिती/ २१० /२०२५ दिनांक: २२ /१२/२०२५

## परिपत्रक

प्रति ,
प्राचार्य /संस्थाप्रमुख,
सर्व संलग्नित ए.एन.एम. व जी.एन.एम संस्था

**विषय :** शै.व. २०२५-२६ साठी महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाशी संलग्नित असलेले खाजगी विना अनुदानित महाविद्यालयातील ए.एन.एम. व जी.एन.एम.व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क मंजूर करण्याकरिता प्रस्ताव सादर करण्याबाबत अतिरिक्त अंतिम मुदतवाढ.

**संदर्भ :** १. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र८९ /२० शिक्षण १, दिनांक.१३.१२.२०२२.
२. शिक्षण शुल्क समितीची बैठक दि. १९/१२/२०२५ .

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ए.एन.एम.,जी.एन.एम.व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या विना अनुदानित महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्याकरीता प्रस्ताव शिक्षण शुल्क समितीकडे ndcsss.info या ऑनलाइन पोर्टलवरील लिंक दि. ०१.०७.२०२५ ते दि.२३.११.२०२५ या कालावधीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेली होती. या काळात प्रस्ताव दाखल न केलेल्या संस्थाच्या विनंतीनुसार अतिरिक्त अंतिम मुदतवाढ खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुदतवाढ | दिनांक | दंडात्मक शुल्क |
|---|---|---|---|
| १. | अतिरिक्त अंतिम मुदतवाढ | दि.२३/१२/२०२५ ते ०६/०१/२०२६ | प्रकिया शुल्क रु.१५०००/- + दंड.रु. ५०००० /- (प्रति कोर्स) मध्य रात्री १२.०० पर्यंत |

ऑनलाइन प्रस्ताव दाखल केल्यानंतर १५ दिवसाच्या आत हार्ड कॉपी प्रस्ताव आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती याच्या कार्यालयात सादर करण्यात यावा. दि.०६/०१/२०२६ मध्यरात्री १२.०० नंतर सदर पोर्टल वर शै.व. २०२५-२६ साठी कोणत्याही प्रकारचे ऑनलाइन प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही. तसेच संपूर्ण कालावधीत ज्या संस्थानी प्रस्ताव सादर केले नाहीत, त्या संस्थावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**टीप :- सदर अतिरिक्त अंतिम मुदतवाढ ही फक्त शै.व. २०२५-२६ साठी देण्यात येत आहे . भविष्यात हा संदर्भ लागू करण्यात येणार नाही याची संस्थानी नोंद घ्यावी.**

( संदिप ढाकणे )
उपसचिव
वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
तथा सदस्य सचिव